MHGO070000792026

निशाणी १ खालील आदेश
**(**घोषीत दिनांक १८ मार्च**,** २०२६**)**

अर्जदार क्रमांक १ ते ४ यांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. थोडक्यात अर्जदारांचा तपशील असा आहे की, मयत मधुकर बुधराम भैसारे हे अर्जदार क्रमांक १ शकुंतला मधुकर भैसारे यांचे पती, अर्जदार क्रमांक २ आरती मधुकर भैसारे, अर्जदार क्रमांक ३ प्रेरणा मधुकर भैसारे तसेच अर्जदार क्रमांक ४ ओजस मधुकर भैसारे यांचे वडील आहेत. मयत मधुकर बुधराम भैसारे यांचे दिनांक ०९/०१/२०२६ रोजी निधन झाले तसेच त्यांचे वडील मयत बुधराम दौलत भैसारे यांचे दिनांक २१/०६/२०२३ रोजी व त्यांची आई मयत चंद्रकला बुधराम भैसारे यांचे दिनांक ०५/०९/१९९९ रोजी निधन झाले. त्यामुळे अर्जदारांच्याव्यतिरिक्त मयताचे इतर कोणीही वारस नाही.

२**)** अर्जदार क्रमांक १ शकुंतला यांनी त्यांचे साक्षी पुराव्याचे शपथपत्र नि.क्रं.१४ प्रमाणे अभिलेखावर दाखल केले आहे. त्यांचे पती मयत मधुकर बुधराम भैसारे, यांचे मृत्यु प्रमाणपत्र, आधार कार्ड, ओळखपत्र, पोलीस पाटील, चिचगड यांनी दिलेला अहवाल, मयत बुधराम दौलत भैसारे आणि मयत चंद्रकला बुधराम भैसारे यांची मृत्यू प्रमाणपत्रे आणि अर्जदारांच्या आधार कार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती अनुक्रमे नि.क्रं.१५ ते २३ वर दाखल केलेल्या आहेत.

३**)** दैनिक कशीशमध्ये दिनांक १३/०२/२०२६ रोजी प्रसिध्द केलेली जाहीरनामा पावती नि.क्र. २४ व प्रसिध्द केलेला जाहिरनामा निशाणी क्रमांक २५ वर आहेत तसेच मयत मधुकर बुधराम भैसारे यांचे वारस असल्याबद्दल सायटेशन नोटीस नि.क्र. १० ते १३ प्रमाणे काढण्यात आले परंतू आजपर्यंत त्यावर कुणीही आक्षेप नोंदविलेला नाही तसेच अर्जदाराने पुरावा बंद केल्याची पुरसीस नि.क्रं.२६ वर अभिलेखावर दाखल केली आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

४**)** आजपर्यंत कुणीही अर्जदारांव्यतिरिक्त वारस असल्याबाबत आक्षेप न घेतल्याने व अर्जदार क्रमांक १ यांनी त्यांच्या दावा शपथेवर साक्ष नोंदवून सिध्द केल्यावरून, मी अर्जदारांना मयत मधुकर बुधराम भैसारे यांचे कायदेशीर वारस आहेत, असे मान्य करतो व खालील प्रमाणे

आदेश पारीत करतो:-

आदेश

१. अर्ज (नि.क्र. १) मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्रमांक १ शकुंतला मधुकर भैसारे, अर्जदार क्रमांक २ आरती मधुकर भैसारे, अर्जदार क्रमांक ३ प्रेरणा मधुकर भैसारे आणि अर्जदार क्रमांक ४ ओजस मधुकर भैसारे यांना मयत मधुकर बुधराम भैसारे यांचे वारस घोषीत करण्यात येते.

३. सदरहू अर्जदारांनी त्यांच्या नावे आवश्यक ती कोर्ट फी भरल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. अर्ज निकाली काढण्यात येतो.

VINAY SAHADEO MENDHE

Digitally signed by VINAY SAHADEO MENDHE
Date: 2026.03.20 12:17:01 +0530

(श्री. व्ही. एस. मेंढे )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
देवरी

दिनांक :१८.०३.२०२६

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | संजीवन वामन मळामे |
| न्यायालयाचे नाव | : | श्री. व्ही. एस. मेंढे, न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग देवरी. |
| आदेशाची तारीख | : | १८/०३/२०२६ |
| आदेशावर अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १८/०३/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १८/०३/२०२६ |